# रूप : कवितेचे

संपादक

प्रा. डॉ. शिरीष लांडगे

प्रा. डॉ. भास्कर ढोके     प्रा. डॉ. संदीप सांगळे



# अ नु क्र म


- संपादकीय | १३

- देविदास चौधरी

  काही हायकू | ३३

- प्रकाश होळकर

  असे कोणत्या | ३७
  माझे आभाळ | ३८
  भरू दे यंदा | ३९

- कमलाकर आत्माराम देसले

  कोठलाही स्वार्थ नाही | ४०
  तुलाच आळवल्यावर कळले | ४१
  मी शब्दांनी बोलत नाही | ४२

- सौमित्र

  त्याला पाऊस आवडत नाही | ४३
  दिस नकळत जाई | ४४
  बघ माझी आठवण येते का... | ४५

- मंगेश नारायणराव काळे

  लाकूडतोड्याची गोष्ट | ४८
  पाणी | ५०
  आत्महत्या | ५१

❑ प्रज्ञा दया पवार

मातीने ओसंडून गच्च वाहणाऱ्या | ५२

शो मी युवर जलवाँ | ५४

शांततेला आता आठवत नाही काहीच | ५६

❑ संतोष पद्माकर पवार

हिराबाई जाफरमियाँ | ५८

धुळवड | ६२

डंगळंग मचळंगऽऽ | ६४

❑ संदीप खरे

नसतेस घरी तू जेव्हा | ६५

आयुष्यावर बोलू काही | ६७

नास्तिक... | ६८

❑ नितीन भरत वाघ

ते तुला देव बनवत राहतील | ७०

या आकळलेल्या मुक्तीचं काय करायचं? | ७२

अफगाण : २००१ | ७४

❑ प्रवीण अक्कनवरू

रे टिमकीबहाद्दरा | ७६

आईला कळायच्या नाहीत माझ्या कविता | ७८

मी फेसबुकवर विचारी | ८०

❑ कवी परिचय | ८२

# कवी परिचय

## देविदास पारूजी चौधरी (३० सप्टेंबर १९६२)

हायकू या जपानी काव्यप्रकारात लेखन करणारे मराठी कवी. त्यांचे 'तसा काहीच अर्थ नाही', 'सोप्पंय सगळं' हे कवितासंग्रह प्रकाशित आहे.

चांदवड तालुक्यातील कुंदलगाव येथे शेती करणारे देविदास चौधरी हे उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांनी प्रांताधिकारी म्हणून मालेगाव बॉम्बस्फोटाच्या वेळी उत्कृष्ट कार्य केले. त्यासाठी त्यांना महात्मा गांधी शांतता पुरस्कारासाठी नामांकन प्राप्त झाले होते. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या वनश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी छोट्या छोट्या शब्दप्रतिमांमधून निसर्गाचे आणि मानवाचे नाते शोधणारी कविता लिहिली आहे.

## प्रकाश होळकर (५ मे १९६३)

प्रकाश होळकर यांचा 'कोरडे नक्षत्र' (१९९७) हा काव्यसंग्रह प्रकाशित असून ना. धों. महानोर यांच्या पत्रांचा संग्रह त्यांनी 'रानगंधाचे गारुड' या नावाने संपादित केला आहे. यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार, विशाखा, घनश्यामदास साहित्य सन्मान त्यांना आदी पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट गीतकार म्हणून चार वेळेस पारितोषिक प्राप्त. ते

अमेरिकेतील पहिल्या विश्व साहित्य संमेलनात निमंत्रित कवी होते.

प्रकाश होळकर यांच्या कवितेचा ग्रामीण भावजीवन आणि शेती हा चिंतनाचा विषय आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांचे दु:खं मांडणारी आणि लोकल कविता हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. ना. घ. देशपांडे, ना. धों. महानोर आणि विठ्ठल वाघ यांची काव्यपरंपरा पुढे घेऊन जाणारे एक महत्त्वाचे कवी आहेत.

## कमलाकर आत्माराम देसले (२४ मे १९६३)

कमलाकर देसले माध्यमिक शिक्षक असून, त्यांचे 'ज्ञानिया तुझे पायी', 'काळाचा जरासा घास', 'काही श्वास विश्वासाठी' या बरोबर कवी खलील मोमीन आणि देसले यांच्यातील काव्यमय पत्रव्यवहाराचा संग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या अनेक कवितांचा विविध संपादनांमध्ये समावेश आहे. त्यांना महाकवी कालिदास, बालकवी, साहित्य प्रबोधन, स्मिता पाटील शब्दपेरा, कवी गोविंद, गिरणा गौरव, माउली साहित्य भूषण आदी पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांनी 'मोल', 'ओ तुनी माय' या चित्रपटांसाठी आणि 'चंद्र दे आणून माझा' या ध्वनिमुद्रिकेसाठी लेखन केले आहे.

## किशोर कदम : सौमित्र (९ नोव्हेंबर १९६५)

किशोर कदम यांच्या 'जोगवा', 'नटरंग', 'पांगिरा', 'एक कप चहा' या मराठी आणि 'ब्लॅक फ्रायडे' या हिंदी चित्रपटांतील भूमिका अविस्मरणीय ठरल्या आहेत. त्यांच्या 'नटसम्राट', 'प्रतिबिंब', 'वाडा चिरेबंदी' आदी नाटकांतील भूमिका उल्लेखनीय मानल्या जातात. त्यांना फिरोज अब्बास खान दिग्दर्शित 'सेल्समन रामलाल' या नाटकातील भूमिकेने आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळाली आहे. त्यांनी तीसपेक्षा अधिक हिंदी - मराठी

नाटकांमध्ये आणि पन्नासपेक्षा अधिक चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. त्यांनी महेश मांजरेकर दिग्दर्शित 'आई'; तसेच 'बिनधास्त', 'नवसाचा पोर', 'आईशपथ' आदी अनेक मराठी चित्रपटांसाठी गीतलेखन; तर दूरचित्रवाणीवरील 'एक धागा सुखाचा', 'प्रपंच', 'नूपुर', 'अवंतिका', 'जन्मलेल्या प्रत्येकाला' आणि 'शुभंकरोती' इत्यादी मालिकांसाठी शीर्षकगीते लिहिली आहेत. त्यांना पुणे येथे झालेल्या २००७ - ०८ च्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात उत्कृष्ट अभिनयासाठीच्या निळू फुले पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना 'फँड्री' या चित्रपटासाठी 'मटा सन्मान' सह अनेक पारितोषिके प्राप्त झाली आहेत.

त्यांचे 'गारवा', 'सांज गारवा', 'ऋतु हिरवा', 'तरीही', 'दिस नकळत जाई', 'एका उन्हाची कैफियत' हे गीतांचे अल्बम प्रकाशित असून 'आणि तरीही,' आणि 'बाउल' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांनी 'आरंभ', 'आज उदय कधीही', 'औदुंबर', 'ओह माय लव्ह' आणि 'मेमरी ऑफ इमोशन' इत्यादी एकांकिकांचे लेखन केले आहे. अत्यंत तरल, भावस्पर्शी आणि जीवनविषयक चिंतन व्यक्त करणारी कविता ही त्यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

## मंगेश नारायणराव काळे (१७ जानेवारी १९६६)

कवी, चित्रकार, समीक्षक आणि 'खेळ' या नियतकालिकाचे संपादक. त्यांचे 'मंगेश नारायण काळेंची कविता', 'शक्तिपाताचे सूत्र', 'नाळ तुटल्या प्रथम पुरुषाचे दृष्टान्त', 'तृतीय पुरुषाचे आगमन', 'मायाविये तहरीर' आदी त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांना अनन्वय फाऊंडेशन (पुणे), यशवंतराव चव्हाण कराड, कुसुमावती देशपांडे मराठवाडा साहित्य परिषद (पुणे), श्रेयस साहित्य गौरव, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र शासनाचा कवी केशवसुत आदी पुरस्कार मिळाले आहेत. त्याचबरोबर इंडिया फाऊंडेशन फॉर द आर्ट, बंगलोर यांची फेलोशीप; तसेच त्यांना भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाची सिनियर रायटर फेलोशीप मिळाली आहे.

## प्रज्ञा दया पवार (११ फेब्रुवारी १९६६)

प्रज्ञा पवार या ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात मराठीच्या सहयोगी प्राध्यापक आहेत. त्यांचे 'अंत:स्थ', 'उत्कट जीवघेण्या धगीवर', 'मी उघडू पाहतेय समग्राशी डोळा', 'आरपार लयीत प्राणांतिक', 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' आदी कवितासंग्रह, 'अफवा खरी ठरावी म्हणून' हा कथासंग्रह, 'केंद्र आणि परीघ', 'टेहलटिकोरी', 'अर्वाचीन आरण' हे ललित गद्य, 'धादांत खैरलांजी' हे नाटक प्रकाशित आहे. त्यांनी नामदेव ढसाळ यांच्या निवडक कवितांचे 'मी भयंकराच्या दारात उभा आहे' या नावाने संपादन केले आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठीचा केशवसुत पुरस्कार, बालकवी पुरस्कार, इंदिरा संत विशेष पुरस्कार आणि ग. ल. ठोकळ विशेष पुरस्कार; तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा विशाखा पुरस्कार, बा. सी. मर्ढेकर, रा. ना. पवार स्मृती, महाकवी अश्वघोष, उषा दातार स्मृती, इंदिरा संत विशेष, कवी केशवसुत, ग. ल. ठोकळ, डॉ. अ. वा. वर्टी, कवयित्री शांता शेळके, बिरसा मुंडा, माता भीमाबाई आंबेडकर, पी. सावळाराम, बोधीवर्धन आणि वनिता समाज गौरव इत्यादी पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांचे साहित्य मल्याळम, तमिळ, कन्नड, गुजराथी, उर्दू, बंगाली, रशियन आणि इंग्लिश भाषांमध्ये भाषांतरित झाले आहे.

## संतोष पद्माकर पवार (२३ मार्च १९७२)

संतोष पद्ममाकर पवार हे श्रीरामपूर येथील रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालयात मराठी विभागात साहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. सध्या ते महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य आहेत. त्यांचे 'कबुली', 'पिढीपेस्तर प्यादेमात', 'बहादूर थापा आणि इतर कविता' हे कवितासंग्रह, 'कविता मला भेटली' ही भित्तिपत्रक कविता आणि 'भ्रमिष्टाचा

जाहीरनामा' ही दीर्घ कविता प्रसिद्ध आहे. त्यांच्या कवितांचा अनुवाद इंडियन लिटरेचरमध्ये प्रकाशित झालेला आहे. त्यांनी अरुण काळे यांच्या 'ग्लोबलचं गावकूस' या कवितासंग्रहाचे संपादन केले आहे. त्यांना 'अभिधानंतर' या नियतकालिकाच्या पुरस्कारासह राधानगरी येथील सह्यगिरी, आपटे वाचन मंदिराचा इंदिरा संत, संजीवनी खोजे, पद्मश्री विखे पाटील साहित्य, पुण्याचा अनन्वय काव्य, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा अ. वा. कुलकर्णी, शेवगावचा दहिवळ गुरुजी, नामदेव ढसाळ, संगमनेरचा अनंत फंदी काव्य पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांना समाजातील विरोधाभासावर उपहासात्मक भाष्य, समाजातील उपेक्षित घटकांचे चित्रण आणि मानवी मूल्याविषयीचे चिंतन ही त्यांच्या कवितेची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

## संदीप खरे (१३ मे १९७३)

'मौनाची भाषांतरे', 'नेणीवेची अक्षरे', 'तुझ्यावरच्या कविता', 'अगोबाई ढगोबाई' हे कवितासंग्रह; तसेच 'दिवस असे की', 'मी गातो एक गाणे', 'कधी हे कधी ते', 'आयुष्यावर बोलू काही', 'नामंजूर', 'सांग संख्या रे', 'डीबाडी डीपांग', 'अगोबाई ढगोबाई', 'ओंजळीत स्वर तुझे', 'संधीप्रकाशात', 'तरुणाई', 'माझ्या मना', 'स्वरशब्दांच्या संध्याकाळी', 'गाणे गा रे गा', 'क्षण मोहरते' आदी ध्वनीचित्रफीती (अल्बम) प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक चित्रपट आणि दूरचित्रवाणीवरील मालिकांसाठी; 'दशावतार' आणि 'एकलव्य' या हिंदी चित्रपटांसाठी गीतलेखन केले आहे. तसेच त्यांनी 'आयुष्यावर बोलू काही', 'अगोबाई ढगोबाई' अशा अनेक लोकप्रिय कार्यक्रमांचे सादरीकरण केले आहे. त्यांना पु. ल. देशपांडे, स्वामीकार रणजित देसाई, मृत्युंजयकार शिवाजी सावंत, केशवकुमार, ग. दि. माडगूळकर, चैतबन, झी गौरव, म. टा. सन्मान आणि फिल्म फेअर आदी अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

मानवीय भावभावना व्यक्त करणारे आणि अत्यंत तरल कविता, गीतलेखन करणारे कवी म्हणून संदीप खरे यांची ओळख आहे.

## नितीन भरत वाघ (२७ जुलै १९७७)

सूक्ष्मजीवशास्त्र आणि मराठी या दोन विषयांत पदव्युत्तर पदवी प्राप्त असलेले नितीन भरत वाघ हे महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळात विद्याव्यासंगी साहाय्यक या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी विश्वकोशात १७५ पेक्षा जास्त नोंदी लिहिल्या असून १२००पेक्षा जास्त नोंदींचे संपादन केले आहे. त्यांचे बौद्ध तत्त्वज्ञानावरील 'झेन', 'प्रतीत्यसमूत्पाद सिद्धांत' आणि 'धम्मपद' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी दिनकर मनवर यांच्या 'दृश्य नसलेल्या दृश्यात' या कविता संग्रहाचे 'बिटवीन द लाईन्स'; तर श्रीधर तिळवे यांच्या 'स्त्री-वाहिनी'चे 'पामस ऑफ लिलिथ' या कवितासंग्रहांचे अनुवाद केले आहेत. त्यांचे 'रा. रा. नेमाडे, देशीवाद' आणि 'The World is Flat' हा समीक्षाग्रंथ, 'व्हर्जिन' ही कादंबरी आणि 'वर्तमान ओलांडून जातांना', 'मोनलिसा स्माईल', 'कार्पे डीम' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत.

समकालीन वास्तव आणि बौद्ध तत्त्वज्ञान हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. मराठी - इंग्लिश भाषेतील एक महत्त्वाचे भाषांतरकार म्हणून ते सर्वपरिचित आहेत. भारतीय भाषांतील काही महत्त्वाच्या पुस्तकांचे त्यांनी केलेली भाषांतरे लवकरच साहित्य अकादमीच्या वतीने प्रकाशित होणार आहे.

## प्रवीण अक्कनवरू (१ ऑगस्ट १९८८)

त्यांनी पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (COEP) बी. टेक. ही पदवी प्राप्त केली आहे. मार्केट रिसर्च, कन्सल्टन्सी, अनुवाद, संपादन, मुद्रितशोधन अशी व्यावसायिक कामे करणारे अक्कनवरू यांनी अरुंधती राय यांच्या निबंधांचा केलेला 'आजादी' हा अनुवाद लवकरच प्रकाशित होत आहे. नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी त्यांची कविता 'अभिधानंतर', 'युगांतर', 'मेहता जगत' आदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झाली आहे.

❑ ❑ ❑

डॉ. दत्तात्रय बाळासाहेब वेळगाळी
(एम. ए. नेट, सेट, पीएचडी)

टीवायबीए मराठी 6-3
रूप : कवितेचे